# मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमा

## ॥ श्री दत्तजयंती ॥

उत्पत्ती - स्थिती - लय या तीन कार्यकारक भावांच्या देवता म्हणजे ब्रम्हा, विष्णु, महेश होय. या त्रिमूर्तींचे एक रूप किंवा उत्तराधिकारी श्री दत्तात्रेय होत. त्यांना 'गुरुमाउली' म्हणून संबोधतात. मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर सायंकाळी दत्ताचा जन्म झाला. पूर्वीच्या काळी भूतलावर स्थूल व सूक्ष्म रूपात आसुरी शक्ती मोठ्या प्रमाणावर वाढल्या होत्या. त्यांना दैत्य म्हटले जाते. देवगणांनी त्या आसुरी शक्तींना नष्ट करण्यासाठी केलेले प्रयत्न असफल झाले. तेंव्हा ब्रम्हदेवाच्या आदेशानुसार वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या रूपात दत्त देवतेला अवतार घ्यावा लागला. त्यानंतर दैत्य नष्ट झाले तो दिवस 'श्री दत्तजयंती' म्हणून साजरा करतात.

दत्तजयंतीला दत्ततत्व हे पृथ्वीतलावर नेहमीच्या तुलनेत १००० पटीने कार्यरत असते. या दिवशी दत्ताची मनोभावे उपासना केल्यास दत्ततत्वाचा जास्तीत जास्त लाभ होतो. या उत्सवापूर्वी सात दिवस 'श्री गुरुचरित्राचे' पारायण करतात. यालाच गुरुचरित्र सप्ताह म्हणतात. दत्तमंदिरामध्ये भजन, किर्तन व आरती करून सुंठवड्याचा प्रसाद वाटप करतात. दत्ताच्या हातातील कमंडलू व जपमाळ हे ब्रम्हदेवाचे प्रतीक आहे. शंख व चक्र विष्णूचे आणि त्रिशूळ व डमरू हे शंकराचे प्रतीक आहे. महाराष्ट्रात गाणगापूर, नरसोबा वाडी इथे या उत्सवाला विशेष महत्व आहे.

॥ श्री गुरुदेवदत्त ॥



सौ. अनघा आपटे
सेवापार्क
m.b. 9146398897